**उद्देश-** विद्यार्थी कथेचे महत्त्व समजून घेतात. व ती कथा आपल्या भाषेत सांगतात. त्या कथेचे तात्पर्य समजून घेऊन त्यापासून आपल्याला काय बोध मिळाला हे समजून घेतात.

**कृतीचे विवरण** -शिक्षकाने अकबर व बिरबलाच्या गोष्टी सांगणे व त्या गोष्टी वाचून घेण्यासाठी ग्रंथालयातील पुस्तकाचा उपयोग करणे.चतुर मैत्रीण या पाठाचे आदर्श वाचन करून त्याचे स्पष्टीकरण सांगणे गटाद्वारे गोष्टीचे वाचन करून मुलांच्या कडून त्यांच्या भाषेत लेखन करून घेणे .

**शैक्षणिक साहित्य** -शाळेच्या ग्रंथालयातील पुस्तके, वर्तमानपत्र, मासिके,

**संबंधित पाठ क्रमांक** - पाठ क्रमांक 16 रिकाम्या जागा भरणे.

**विद्यार्थी कृतीपुस्तकातील कृती क्र** - 6. 2

**कृती क्रमांक** - 6. **कृतीचे नाव** - व्यक्तीचे वर्णन

**उद्देश** – मुले आपल्या भारत देशासाठी बलिदान दिलेल्या व्यक्ती विषयी जाणून घेतात. त्यांनी देशासाठी केलेले कार्य समजून घेतात.

**कृतीचे विवरण -** महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व जाणून घेऊन आपली पत्नी सावित्रीबाईंना शिकवून त्यांनी स्त्रीयांना शिकवण्यास सांगितले, हे मुलांना समजावून सांगणे. शिक्षणाचे महत्त्व आपल्या जीवनात काय आहे? स्त्रिया शिकून पुरुषांच्या बरोबर काम करतात हे मुलांना पटवून सांगणे. तसेच महात्मा गांधी यांच्या विषयी माहिती सांगून वीर हुतात्मा नारायण या पाठाचे आदर्श वाचन करून माहिती सांगून मुलांच्या मध्ये देशप्रेम निर्माण करणे. नेत्यांची माहिती लिहून घेऊन राष्ट्रीय सणाला भाषण करण्यास प्रोत्साहन देणे. चित्रांचा संग्रह करणे व माहिती लिहून घेणे.

**शैक्षणिक साहित्य -** नेत्यांची चरित्रे, पुस्तके ,चित्रे, फोटो

**संबंधित पाठ क्रमांक -** 1. पाठ क्रमांक सात वीर हुतात्मा नारायण

**कृती पुस्तीकातील कृती क्रमांक** - 6.3

**अध्ययन कृती क्रमांक-** 6.4 **कृतीचे नाव:** कथा जाणून घे.महाशिवरात्र(कथा),जादूगार (कविता)

**उद्देश –** सणासंबंधीच्या कथेचे महत्व जाणून घेतात.तसेच कवितेतून परिसराचे वर्णन समजून घेतात. परिसराचे आवड निर्माण करून घेतात.

**कृतीचे विवरण -** महाशिवरात्र या कथेचे विश्लेषण व महत्त्व मुलांना सांगणे. सणांचे काय महत्त्व आहे त्यांच्या पाठीमागचा उद्देश काय आहे हे सांगणे .गटाद्वारे प्रत्येक धर्मातील सणांच्या विषयी चर्चा करून घेऊन त्याविषयी थोडक्यात माहिती लिहून घेणे. कवितेचे वाचन करून भावार्थ सांगणे. परिसराचे महत्त्व व संरक्षण याबद्दल विद्यार्थ्यांच्या द्वारे संभाषण करून आपण काय केले पाहिजे हे त्यांना पटवून सांगणे.

**शैक्षणिक साहित्य-** गोष्टीची पुस्तके, कथासंग्रह, कवितासंग्रह

**संबंधित पाठ क्रमांक** पाठ 9 जादूगार या कवितेतील चित्रे काढून रंग भरणे ,समानार्थी शब्द लिहिणे, जोड्या जुळवणे

**विद्यार्थी कृतीपुस्तकातील कृती क्र** - 6.4

**अध्ययन कृती क्रमांक :6.5** **कृतीचे नाव** : मधमाशीची ओळख

**उद्देश-** नावावरून गावांची, फुलांची, कीटकांची नावे ओळखतात. तसेच मधमाशी ही काय करते त्याच्या पासून आपण काय घ्यावे हे समजून घेतात.

**कृतीचे विवरण –** शिक्षकांनी मधमाशी या कवितेचे आदर्श वाचन करून मुलांना भावार्थ सांगणे. त्यांच्याकडून प्रत्येक कडव्याचे वाचन करून घेणे. नवीन शब्दांचा अर्थ सांगणे .ती कोणते काम करते व तिच्याकडून काय शिकावे व आत्मसात करावे याचे चर्चेद्वारे स्पष्टीकरण करून मुलांच्या कडून मधमाशीचे गुण आणि उद्योगी कीटकांची नावे लिहून घेणे.

**शैक्षणिक साहित्य –** चित्र, तक्ता

**संबंधित पाठ क्रमांक -** संबंध पाठ 6 या वरील स्वाध्याय सोडवून घेणे ,पोळयाचे चित्र काढणे ,मधाचा उपयोग लिहिणे .

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र** - 6. 5

**अध्ययन कृती क्रमांक** -6.6 **कृतीचे नाव-** उतारा

**उद्देश** - उतारा वाचन करून त्यावरील प्रश्नांची कशी उत्तरे लिहावी ते समजून घेतात. विरामचिन्हांची माहिती समजून घेतात.

**कृतीचे विवरण :** शिक्षकांनी उतारा वाचून त्यावरील प्रश्न व विरामचिन्हांची माहिती सांगणे. पालेभाज्या फळभाज्यांचे महत्त्व समजावून सांगणे .आपल्या आरोग्याला किती चांगले आहे हे पटवून देणे गटाद्वारे वाचन करून घेणे. गटाद्वारे प्रश्नांची उत्तरे लिहून घेणे.कोण लवकर लिहितात या गटाचे अभिनंदन करणे.

**शैक्षणिक साहित्य** - पुस्तक ,वर्तमानपत्र

**संबंधित पाठ क्रमांक** - पाठ 13 यावरील उतारा

**मूल्यमापन कृती**:1. अक्षरात लिहिलेले वाक्य वाचून उत्तर सांगणे . 2 होय किंवा नाही सांगणे.

**विद्यार्थी कृतीपुस्तकातील कृती क्र** - 6.6

**<u>अध्ययन निष्पत्ती क्रमांक : 5.7</u>**

**अध्ययन निष्पत्ती-** अपरिचित संवाद चर्चा नाटक समजून घेतात आणि त्यात सहभागी होतात.

**अध्ययन निष्पत्ती व्याप्ती व महत्त्व-**: पाहिलेले नाटक किंवा वर्गातील विद्यार्थ्यांच्या मित्राबरोबर छोटे छोटे नाटक रचतात व वर्गात सादरीकरण करतात. वर्गातील विद्यार्थी मित्रासोबत परीक्षेच्या अगोदर दोन मित्रांच्या संभाषणाचा संवाद लिहितात. व वर्गात त्याचे सादरीकरण करण्यास सांगून त्यांना प्रोत्साहित करावे. चित्र पाहून दोघांमधील संवाद करतात व स्वतः वर्गात सादर करतात.

**अध्ययन कृती क्रमांक: 7.1** **कृतीचे नाव -** छोटे छोटे नाटक सादर करणे.

**उद्देश-** विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना सुप्त कलागुणांना वाव देणे तसेच मुलांच्या अभिव्यक्तीचा विकास करणे व बोलण्यास संधी देणे अभिनय गुणांना वाव देणे.

**कृतीचे विवरण -** वर्गामध्ये चार ते पाच विद्यार्थ्यांचा एक गट याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांना नाटकातील पात्रे देऊन नाटक सादरीकरण करून घेणे तसेच प्रत्येक विद्यार्थ्याकडून एक पात्री नाटक वर्गात सादर करून त्यांना प्रेरित करणे.

**शैक्षणिक साहित्य -** छोटी छोटी नाटकांची पुस्तके इत्यादी.

https://youtu.be/isKub4QL1eY

**संबंधित पाठ क्रमांक -** इयत्ता चौथी मधील पाठ क्रमांक 13 खरा नायक व पाचवी वर्गातील पाठ क्रमांक 2 - तीन मूर्ती.

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र** - 7.1

**अध्ययन कृती क्रमांक- 7.2** **कृतीचे नाव-** संगणकाचा महिमा(संवाद)

**उद्देश-** संगणकाची महिति व कार्य समजून घेणे.संगणकाचे,फायदे,तोटे याविषयी माहिती समजून घेणे व मुलांच्या बुद्धी चा विकास करणे.

**कृतीचे विवरण**-संगणकाचे चित्र पाहुन त्या आधारे त्याचे भाग,कार्य,त्याचे फायदे इत्यादी विषयाचे ज्ञान विद्यार्थ्यांकडून आजमवने.संगणक हे विशेषता तंत्रज्ञान,शिक्षण आणि संशोधन या क्षेत्रांत वापरले जाते.याचे महत्त्व पटवून देणे.व विद्यार्थ्यांना संगणक हाताळण्यास प्रेरित करणे.

**शैक्षणिक साहित्य-** संगणक, संगणक भागाची चित्रे

**संबंधित पाठ क्रमांक-** 15 -एफ एम रेडिओ.

विद्यार्थी कृतीपुस्तकातील कृती क्र - 7.2
अध्ययन कृती क्रमांक -**7.3** **कृतीचे नाव:** चित्र पहा वाक्य लिहा.
**उद्देश :** चित्रासंबंधी माहिती लिहिता यावी.

**कृतीचे विवरण :** दिलेल्या चित्रासंबंधीची माहीती विद्यार्थ्यांच्याकडून लिहून घेणे

**शैक्षणिक साहित्य :** विविध साधनांची चित्रे.

**संबंधित पाठ क्रमांक :** 15 एफ एम रेडिओ.

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र :7.3**

**अध्ययन कृती क्रमांक** -7.4 **अध्ययन कृतीचे नाव-** संवाद तयार करणे उद्देश विद्यार्थी पूर्व ज्ञानात आधारे चित्र प्रसंगातील संवाद तयार करणे व मुलांच्या अभिव्यक्तीचा विकास करणे.

**कृतीचे विवरण-** दिलेल्या वेगवेगळ्या प्रसंगाची किंवा झाड व नदी यांची चित्रे पहा व चित्र आधारित विद्यार्थ्याकडून संवाद तयार करून घेणे. शिक्षकाने अशाच प्रकारची चित्रे किंवा चित्रफीत विद्यार्थ्यांना दाखववावी व त्या आधारे सराव कृती करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे.

**शैक्षणिक साहित्य -** वनस्पती, नदी, प्राणी, पक्षी इत्यादी चित्रे.

https://images.app.goo.gl/cRAHMR4GQUYEDeZB8

**संबंधित पाठ क्रमांक** - 15

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र** - 7.4

**अध्ययन कृती क्रमांक -7.5** **कृतीचे नाव-** कोरोनाविषयी संवाद

**उद्देश -** आजच्या वाढत्या संकटातील घटना, कोरोना विषाणू याची माहिती जाणून घेणे . त्याचा जनजीवनावर झालेला परिणाम समजून घेणे कोरोनाव्हायरस वरील प्रतिबंधक औषध उपचार उपाय समजून घेणे.सोबत कोरणा विषयी चर्चा करतात व मित्रा सोबत संवाद तयार करून घेऊन त्याचे वर्गात सादरीकरण करून घेणे. कोरोनाच्या काळात ऑनलाइन शाळा कशी भरली गेली याचे विवरण विद्यार्थ्यांकडून करून घेणे. शिक्षकानी अशा प्रकारे संवाद तयार करून घेऊन त्याचे वर्गात सादरीकरण करून घेणे.

**शैक्षणिक साहित्य-** मोबाईल

**संबंधित पाठ क्रमांक** -15

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र** - 7.5

**अध्ययन कृती क्रमांक**-7.6 **कृतीचे नाव** - परीक्षेविषयी संभाषणाचा संवाद.

**उद्देश** -विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम आधारित परीक्षेची पूर्वतयारी करावी लागते याची कल्पना जाणून घेणे व परीक्षेची तयारी करणे. हे समजून घेणे.

**कृतीचे विवरण** - विद्यार्थी परीक्षेच्या एक दिवस आधी दोन मित्रांच्या संभाषणाचा संवाद वर्गात लेखी स्वरूपात घेऊन त्याचे वर्गात सादरीकरण करण्यास प्रवृत्त करणे. विद्यार्थ्यांना परीक्षेची भीती न बाळगता ती शांतपणे सोडवावी असे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे. परीक्षेच्या आधी अभ्यासक्रमाची उजळणी करावी व उजळणी मुळे अभ्यासातील समस्या दूर होतात हे पटवून देणे.

**शैक्षणिक साहित्य-** पेन, वही, पाठ्यपुस्तक, मोबाईल

**संबंधित पाठ क्रमांक** -15

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र** - 7.6

## अध्ययन निष्पत्ती क्रमांक-5.8

**अध्ययन निष्पत्ती:**पुस्तक कथा फलक वर्तमानपत्र यावरील छापील तसेच लिखित मुद्दे वाचतात.

**अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्व** - विद्यार्थी ऐकलेल्या, वाचलेल्या कथा सांगतात. विद्यार्थी साहशी कथांची पुस्तके वाचन करून ती आपल्या भाषेत प्रकट करतात. विद्यार्थी शाळेतील कार्यक्रमांचे फलक लेखन सराव करून ते फलक लेखन वाचण्यास प्रेरित होतात. कथांचे वाचन करून तात्पर्य समजून घेतात. विद्यार्थी वर्तमानपत्रातील ठळक मजकूर हवामानाविषयी माहिती संग्रहीत करतात व त्याचे प्रकट वाचन वर्गात करतात. विद्यार्थी वर्तमानपत्रातील कात्रणे काढून कागदावर किंवा कार्डशिट वर चिकटतात व त्याचे वर्गामध्ये प्रदर्शित करतात.

**अध्ययन निष्पत्ती क्रमांक-8.1** **कृतीचे नाव**-- बोधकथा

**अध्ययन कृती चे उद्देश--** विद्यार्थी पूर्वज्ञान आधारित कथा तयार करणे. व त्या कथेचा अर्थबोध करून घेणे. विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीचा विकास व सुप्त गुणांचा विकास करणे.

**कृतीचे विवरण**: दिलेल्या किंवा माहित असलेल्या कथा आपल्या भाषेत प्रकट करण्यास प्रेरित करावे. शिक्षकांनी त्या कथेचा तात्पर्य, ध्येय विद्यार्थ्यांना समजून द्यावे. शिक्षकानी काही शब्द देऊन त्या आधारित शब्द वापरून कथेची रचना करण्यास प्रोत्साहित करणे. व लिहिलेली कथा प्रस्तुत करण्यासाठी अवकाश देणे. व चर्चा घडवून आणणे. शिक्षकांनी या चर्चेच्या आधारावर मुलांना कथेचा बोध/ तात्पर्य लिहायला प्रेरित करावे. कथेचे समजपूर्वक वाचन करण्याची क्रिया समजण्यासाठी मुलांना कथेवर विविध प्रकारे विचार करण्यास प्रेरित करावे. मुलांना हावभाव सहित वाचण्यास प्रोत्साहन द्यावे .कथा चांगली समजण्यासाठी छोट्या-छोट्या गटात चर्चा घडवून आणा.

**शैक्षणिक साहित्य** --कथा संग्रह, पेन ,वही.

**संबंधित पाठ क्रमांक** --16 चतुर मैत्रीण या पाठाचा संदर्भ घ्यावा.

युट्युब लिंक-https://youtube.com/watch?v=1UrJnqcc7tw&feature=share

**विद्यार्थी कृतीपुस्तकातील कृती क्र** - 8.1

**कृती क्रमांक-8.2** **कृतीचे नाव** - साहसी कथा .

**उद्देश--** पूर्वज्ञान आधारित साहसी कथांचे लेखन करून त्या कथेचे प्रकट वाचन करणे. विद्यार्थी साहसी नेत्यांची चरित्र विषयी माहिती वर्गात सादर करणे. विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीचा विकास करणे.

**कृतीचे विवरण-** शिक्षकांनी साहशी नेत्यांची, राजा महाराजांची चित्रे दाखवून त्या आधारित कथा लेखन किंवा चरित्र लेखन करण्यास द्यावे व ती वर्गात सादर करण्यास प्रोत्साहित करावे. सहाशी कथेतील घटना विषयी विद्यार्थ्यांना नोंद करण्यास सांगावे. सुलभकानी विद्यार्थ्यांना चित्रफित दाखवावी व त्या आधारे सराव कृती करण्यास प्रेरित करावे. वर्गात साहसी नेत्यांचे चित्र दाखवा व मुलांना त्यातील वस्तू विषयी विचार करायला व बोलण्यासाठी सांगा चित्रातील व्यक्ती काय करीत असेल? त्यांनी केलेले कार्य कोणते? इत्यादी प्रश्ना आधारे एक गोष्ट तयार केली जाऊ शकते नंतर तीच गोष्ट मुलांना लिहायला सांगावी.

**शैक्षणिक साहित्य** -नेत्यांचे फोटो, साहसी कथांची पुस्तके ,नेत्यांचा चरित्र संग्रह.

https://youtube.com/watch?v=IlA-2prfgzI&feature=share

**संबंधित पाठ क्रमांक --**2 तीन मूर्ती.

**विद्यार्थी कृतीपुस्तकातील कृती क्र** - 8.2

**अध्ययन कृती क्रमांक -8.3.** **कृतीचे नाव--** फलक लेखन

**उद्देश--** विद्यार्थी शाळेत होणाऱ्या कार्यक्रमाचे, शाळेचे स्वागत समारंभ स्वतःच्या पद्धतीने लिखाणातून व्यक्त करतील व करतात व विद्यार्थी आत्मविश्वासाने स्वतःला प्रकटीकरण करतील.

**कृतीचे विवरण--** दिलेल्या किंवा शाळेतील वेगवेगळ्या कार्यक्रमांचे, शाळा प्रारंभ उत्सव कार्यक्रमाचे, सणांचे, चर्चेद्वारे विद्यार्थ्यांकडून फलक लेखन केलेल्या लिखित मसुद्याचे प्रत्येक

विद्यार्थ्याकडून प्रकट वाचन करण्यास प्रेरित करणे. प्रत्येक विद्यार्थ्याला वाचण्याची संधी द्यावी. फलक लेखन वाचन केलेल्या विद्यार्थ्याचे वर्गात सर्वासमोर गौरव करणे. विद्यार्थ्यांना परिसरात होणाऱ्या कार्यक्रमाचे फलक लेखन लिहून आणण्यास सांगून त्याचे वर्गात सादरीकरण करून घ्यावे. चित्राद्वारे फलक लेखन करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे. कोणत्याही विषयावर वर्गात लेखन करण्याआधी चर्चा आवश्यक घडवून आणा . त्या विषयावर मुलांना स्वतः विचार व बोलण्याची संधी द्या. त्यानंतरच त्यांना लिहिण्यासाठी सांगा. विद्यार्थ्यांच्या स्वतःचे मत लेखनाच्या माध्यमातून प्रकट करण्यास वाव द्यावा.

**शैक्षणिक साहित्य-** रंगीत खडू, डस्टर, फळा.

**संबंधित पाठ क्रमांक**--20

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र** - 8.3

**अध्ययन कृती क्रमांक--8.4** **कृतीचे नाव** --राष्ट्रीय सणाचे फलक लेखन .

**उद्देश--** विद्यार्थी राष्ट्रीय दिनाचे महत्त्व जाणून घेतील.व विद्यार्थी फलक लेखनाचे प्रकट वाचन करतील.

**कृतीचे विवरण--** दिलेल्या किंवा शाळेत राष्ट्रीय सण साजरे करणाऱ्या दिनानिमित्त विद्यार्थ्याकडून सुंदर हस्ताक्षरामधे लेखनातून प्रकट करून घेणे. शिक्षकानी फलकावर चित्राद्वारे एखाद्या दीनांचे लेखन करून त्या लेखनाचे प्रत्येक विद्यार्थ्याकडून प्रकट वाचन करून घ्यावे. फलक लेखन सुंदर व उत्तम सुवाच्छ अक्षरात लिहिलेल्या विद्यार्थ्यांचे सर्वासमोर गौरव करून त्याचे अभिनंदन करणे. मुलां द्वारे काढलेले चित्र आणि लिहिलेले त्यांना वाचून सांगण्यास प्रोत्साहित करा. मुले जे सांगतील ते तुम्ही बरोबर लिहा. आणि मुलांना पुन्हा लिहायला सांगा. विद्यार्थ्यांची समजून घेण्याची क्षमता विकसित व्हावी याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे व विद्यार्थ्यांना स्वयं लेखन करता यावे यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.

**शैक्षणिक साहित्य-** रंगीत खडू, फळा ,डस्टर , https://youtu.be/lKrn8aD2-yg

**संबंधित पाठ क्रमांक**- 9

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र** - 8.4

**अध्ययन कृती क्रमांक --8.5.** **कृतीचे नाव--** वर्तमानपत्रातील मुद्दे

**उद्देश--** विद्यार्थ्यांना रोजचे दिनविशेष, हवामान अंदाज जाणून घेतील तसेच विद्यार्थी वर्तमानपत्रातील लिखित मसुद्याचे प्रकट वाचन करतील.

**कृतीचे विवरण--** विद्यार्थ्यांना प्रार्थनेच्या वेळी वर्तमानपत्रातील मुख्य मुद्दे प्रकट वाचन करण्यास प्रेरित करणे. जवळच्या वाचनालयातून हवामान अहवाल संग्रहित करण्यास सांगून त्या अहवालांच्या नोंदी वहीत नमूद करण्यास प्रवृत करणे. वर्तमानपत्रातील मागील आठवड्याच्या हवामान अहवालांची कात्रण काढून जमविण्यास सांगणे व ती सर्व कात्रणे पांढऱ्या कागदावर किंवा कार्डशीट पेपर वर चिकटविण्यास प्रोत्साहन देणे व ती केलेली कृती वर्गात सादरीकरण करण्यास प्रेरित करणे.

**शैक्षणिक साहित्य --**वर्तमानपत्र, दूरदर्शन संच, रेडिओ, मोबाईल .

**संबंधित पाठ क्रमांक** -15 एफ. एम. रेडिओ.

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र** - 8.5

**अध्ययन निष्पत्ती क्रमांक - 5.9**

**अध्ययन निष्पत्ती-** माहिती असलेल्या मुद्द्यावरील प्रश्नांची सकारण उत्तरे देतात. व त्यावर लेखन करतात.

**अध्ययन निष्पत्ती ची व्याप्ती आणि महत्व** – 1. माहिती असलेल्या प्रश्नांची सकारण उत्तरे लिहितात. 2. शालेय जीवनात शिस्तीचे पालन करतात. 3. खेळामुळे वेळेचे बंधन,धैर्य, शिस्त गटामध्ये सांघिक भावनेचे महत्त्व समजून घेतात. 4. वाचनाने बुद्धीचा विकास होतो. फलक लेखन वरील सुविचाराचे अर्थ समजून घेतात. 5. मानसिक, शारीरिक, बौद्धिक आणि सामाजिक प्रत्येक प्रकारे निरोगी राहण्यासाठी वैयक्तिक स्वच्छता अत्यंत आवश्यक आहे हे समजून घेतात. 6. सणाचे महत्त्व समजून घेतात.

**अध्ययन कृती क्रमांक 9.1** **कृतीचे नाव:** शिस्तीचे महत्व.

**उद्देश:**विद्यार्थी जीवनातील शिस्तीचे पालन कसे करायचे समजून घेतील.

**अध्ययन कृतीचे विवरण:** कृतिपुस्तिका मध्ये दिलेल्या मध्यान आहार योजना संदर्भातील माहिती विद्यार्थ्यांना समजावून सांगावी व 'शाळेचा विकास' या योजनेचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून द्यावे.

**शैक्षणिक साहित्य**: चार्ट, फोटो, जेवणाचे साहित्य.

**संबंधित पाठ क्रमांक**: कृतिपुस्तिका मध्ये दिलेल्या मूल्यमापन कृती 9.1 वरील प्रश्नांची उत्तरे घेणे. शिस्त या विषयावर निबंध लिहिण्यास देणे.

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र** - 9.1

**कृती क्रमांक :9.2** **कृतीचे नाव:** खेळाचे महत्व

**उद्देश:** खेळामुळे वेळेचे बंधन, धैर्य, शिस्त, आत्मविश्वासाची पातळी वाढविणे. आणि आजारापासून सुरक्षित राहणे हे समजून घेतील.

**कृतीचे विवरण:** कृती पुस्तिका मध्ये दिलेल्या कृती क्रमांक 9.2 खेळाचे महत्व या संदर्भातील माहिती समजावून सांगावी.आपल्या शारीरिक विकासाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजून देणे.

**शैक्षणिक साहित्य:** खेळाचे साहित्य, खेळाचे चित्र, मैदानाचे चित्र

**संबंधित पाठ क्रमांक**.

**विद्यार्थी कृतीपुस्तकातील कृती क्र** - 9.2

**अध्ययन कृती क्रमांक-9.3:** **कृतीचे नाव:** सुविचारांचे वाचन व विश्लेषण.

**उद्देश:** सुविचारांच्या वाचनाने बुद्धीचा विकास होतो व विद्यार्थी तर्क करतात.

**कृतीचे विवरण:** विद्यार्थ्यांना फलक लेखन देऊन वाचन घेणे. सुविचार फलक तयार करून घेणे आणि त्याचे विश्लेषण करून विद्यार्थ्यांना समजून देणे. विद्यार्थ्यांना सुविचार लिहिण्यास सांगणे आणि अर्थ विचारणे.

**शैक्षणिक साहित्य:** चार्ट, फलकलेखन, भिंतीपत्रिका.

**संबंधित पाठ क्रमांक:** विद्यार्थ्यांना सुविचार लिहिण्यास देणे. लिहलेल्या सुविचाराचे विश्लेषण करून घेणे.

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र** - 9.3

**अध्ययन कृती क्रमांक: 9.4** **कृतीचे नाव:** आपले अवयव.

**उद्देश:** आपले अवयव व वैयक्तिक स्वच्छता कशी ठेवावी हे समजून घेतील.

**कृतीचे विवरण:** आपल्या शरीराचे अवयव विद्यार्थ्यांना विचारणे. प्रत्येक अवयवाचे कार्य समजून देणे. वैयक्तिक स्वच्छता कशाप्रकारे करावी, स्वच्छतेने होणारे फायदे लिहून देणे.

**शैक्षणिक साहित्य:** चार्ट, मानवी शरीर आकृती.

**संबंधित पाठ क्रमांक:**

**विद्यार्थी कृतीपुस्तकातील कृती क्र** 9.4

**अध्ययन कृती क्रमांक- 9.5** **कृतीचे नाव:** आवडता सण दिवाळी.

**उद्देश:** मुलांनी आपली संस्कृती समजावून घेणे.

**कृतीचे विवरण:** कृती पुस्तिका मध्ये दिलेल्या कृती क्रमांक 9.5 आवडता सनदिवाळी या संदर्भातील माहिती विद्यार्थ्यांना समजावून सांगावी. दिपवाली कविता म्हणून घ्यावे. विद्यार्थ्यांकडून दिवा, आकाश कंदील(कार्तिक), रांगोळी इत्यादी कृती करून घ्यावी.

**शैक्षणिक साहित्य:** चार्ट, पेपर, कात्री, गम, मातीचे साहित्य.

**संबंधित पाठ क्रमांक:**

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र : 9.5**

## अध्ययन निष्पत्ती क्रमांक - 5.10

**अध्ययन निष्पत्ती-** विनोद साहस सामाजिक विषयांवर आधारित कथा कविता इत्यादींमधील विषय,घटना,चित्र,पात्र, शीर्षक याबद्दल चर्चा करतात व तार्किक स्वरूपात चिंतन करून निर्णय घेतात.नवीन अपरिचित शब्दांचा अर्थ शब्दकोशात शोधतात .

**अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती व महत्व –**विनोद, कोडे समजून घेतात व ती स्वतः सांगतात. मनाला एक विरंगुळा घडवून आणण्यासाठी उत्तेजित करतात व आंनद व्यक्त करतात.विध्यार्थी भूषण, संकट, काम, नम्रता, प्रमाण, वाचन यांचे महत्व समजून घेतील व त्याचा आपल्या जीवनात आचरण करतील. चांगल्या व वाईट गोष्टीचे ज्ञान करून घेतात. अंधश्रद्धेमुळे आपण वाईट कामाकडे न जाता चांगले कार्य करत राहणे. जीवन हे संघर्षमय असून अडथळे येतच असतात हे समजून घेतात. बोधकथा वाचून समजून घेतात.समाजकार्य केलेल्या व्यक्ती विषयी माहिती व त्यांनी केलेले कार्य समजून घेतात. राष्ट्रीय नेते याविषयी माहिती समजून घेतात. त्यांनी केलेल्या कामाची नोंद ठेवतात. त्यांच्या जयंतीदिनी ते भाषण करतात . वनस्पतीचा उपयोग आपल्या जीवनात काय आहे हे समजून घेवून त्याची माहिती लिहितात. झाडांचे संरक्षण करतात. झाडे लावतात व वाढवितात. तेनाली रामाचे चातुर्य यामध्ये तेनाली रामा कसा तरबेज होता हे मुले समजून घेतात.बोलीभाषेतील कवितेचा भावार्थ समजून घेऊन लयबद्ध शब्द शोधतात. चिमणी घरटे कसे बनवते हे समजून घेतात.

**अध्ययन कृती क्रमांक** -10 .1

**अध्ययन कृतीचे नाव :-** कोडी व विनोद (जादूगार)

**उद्देश -** विद्यार्थी बुद्धीला चालना देऊन आनंद व्यक्त करताना. त्यांच्यात चुरस निर्माण होऊन खेळाद्वारे कोडी सोडवतात. विनोदाचा आस्वाद घेतात.

**कृतीचे विवरण-** शिक्षकांनी 'जादूगार' या कवितेचे आदर्श वाचन करून त्याचा भावार्थ सांगणे. कोणत्या गोष्टी कोडी विनोदा प्रमाणे आहेत त्यांचे स्पष्टीकरण सांगणे व त्या गटाद्वारे चर्चात्मक पद्धतीने घेऊन चित्र पाहून ओळखण्यास सांगणे. चित्रातील मुलांच्या कडून दोन तीन वाक्यात वर्णन लिहून घेणे. यूट्यूब च्या साहायाने झटपट कोडी सोडवून घेणे.

**शैक्षणिक साहित्य -** चित्रे ,तक्ता, पेपर ,फोटो,

**संबंधित पाठ क्रमांक:** पाठ्य पुस्तकातील समानार्थी शब्द,

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र:** 10.1

**अध्ययन कृती क्रमांक-** 10 .2 **कृतीचे नाव** - बोधाचा स्पर्श

**उद्देश-** विद्यार्थी दागिने, वेश, प्रमाण, नम्रता, वाचन, ज्ञान, खेळ, कष्ट यांचे महत्त्व जाणून घेतात. हे महत्त्व आपल्या जीवनात कसे असावे हे समजून घेतात.

**कृतीचे विवरण-** शिक्षकांनी कवितेचे आदर्श वाचन करून भावार्थ सांगणे. व त्या बोधातून मुलांच्या जीवनात काय उपयोग आहे याचे गटातून चर्चात्मक पद्धतीने मार्गदर्शन करणे. व स्पष्टीकरण सांगणे. लहान वयात आपण या गोष्टी आत्मसात करण्यास सांगणे. दोन गट करून एका गटाला कवितेचे वाचन देणे व दुसऱ्या गटाला त्याचा भावार्थ आपल्या भाषेत सांगण्यास प्रोत्साहन देणे. नवीन शब्दांचा अर्थ सांगून लिहून घेणे. चांगल्या गोष्टी कोणत्या व वाईट गोष्टी कोणत्या यातील फरक चर्चा करून सांगणे. विचारधन सुविचार यांचा संग्रह करून दररोज सांगण्यास सांगणे.

**शैक्षणिक साहित्य-** पाठ क्रमांक 22 बोधाचा स्पर्श,दृकपट्या, बोधवाक्य यांच्या पट्ट्या, तक्ता

**संबंधित पाठ क्रमांक:** पाठ क्रमांक 22 बोधाचा स्पर्श

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र:** 10.2

**अध्ययन कृती क्रमांक- 10 .3** **कृतीचे नाव** – अंधश्रद्धा

**उद्देश** - अंधश्रद्धा ही चुकीची समजूत आहे. त्यातून आपले जीवन वाया घालवतो. हे समजून घेतील माणसाला संकटे येतच असतात.त्यातूनच आपण शिकून पुढे जावे हे समजून घेतील. बोधकथा आत्मसात करतील.

**कृतीचेविवरण** - अंधश्रद्धा यांचे स्पष्टीकरण करताना खालील कृतीद्वारे चित्र व संभाषण गटाद्वारे घेणे. त्यातून आपण काय शिकले पाहिजे याविषयी आपल्या परिसरात घडणाऱ्या घटनांचे वर्णन करण्यास सांगून माहिती देणे. चांगल्या गोष्टी व वाईट गोष्टींचे विश्लेषण करणे. त्यांचा आपल्या जीवनावर कसा परिणाम होतो हे पटवून सांगणे. बोधकथांचा वापर करून आपण आपले जीवन कसे बदलू शकतो याचे स्पष्टीकरण करणे.

**शैक्षणिक साहित्य** - इसापनीतीच्या गोष्टी, वर्तमानपत्र

**संबंधित पाठ क्रमांक:** 'बोधाचा स्पर्श' पाठ क्रमांक 22

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र:**10.3

**अध्ययन कृती क्रमांक : 10 .4** **कृतीचे नाव** - प्रसिद्ध व्यक्ती.

**उद्देश** - प्रसिद्ध व्यक्तींनी केलेले कार्य समजून घेतील. व त्यांच्या कार्याचा आदर्श आपल्या जीवनात कसा आणावा याचा विचार करतील.

**कृतीचे विवरण** – शिक्षकांनी, आपल्या भारत देशाला उद्योगधंद्याच्या बाबतीत पुढे घेऊन जाण्याचे श्रेय 'सर विश्वेश्वरय्या' त्यांना जाते याचे स्पष्टीकरण मुलांना सांगणे. त्यांनी आपल्या काळात केलेल्या कार्याचे महत्त्व चर्चात्मक पद्धतीने सांगणे. कार्याची माहिती मुलांकडून लिहून घेणे. 'बसवेश्वर' या पाठाचे आदर्श वाचन करून मुलांच्या कडून एक एक परिच्छेद वाचून घेणे. मुलांच्याकडून बसवेश्वरांनी केलेल्या कार्याची माहिती लिहून घेणे.

**शैक्षणिक साहित्य** - व्यक्तींची चित्रे आणि चरित्रे, फोटो

**संबंधित पाठ क्रमांक:** पाठ क्रमांक 21 बसवेश्वर

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र :** 10.4

**अध्ययन कृती क्रमांक 10 .5** **कृतीचे नाव** - राष्ट्रीय नेते

**उद्देश-** आपल्या देशातील नेत्या विषयी माहिती समजून घेतील व त्यांची चित्रे घेऊन तक्त्यावर माहिती लिहितील.त्यांची जयंती साजरी करताना भाषणे करतील.

**कृतीचे विवरण** - शिक्षकांनी ग्रंथालयातील पुस्तके घेऊन नेत्या विषयी माहिती सांगणे. गटाद्वारे प्रत्येक नेत्याचे पुस्तक देऊन वाचन करून घेणे. माहिती लिहून घेणे. त्यांचे कार्य याबद्दल चर्चा करणे. देश भावना जागृत करण्यासाठी त्यांना दिलेली उपाधी याविषयी शिक्षकांनी स्पष्टीकरण करणे. 'वीर हुतात्मा नारायण' या पाठाचे वाचन करून भावार्थ सांगणे. चित्रांचा संग्रह करून अल्बम तयार करणे.

**शैक्षणिक साहित्य-** चरित्र, नेत्यांचे तक्ते, चित्रे, फोटो अल्बम

**संबंधित पाठ क्रमांक:** पाठ क्रमांक 7. 'वीर हुतात्मा नारायण'

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र. :**10.5

**अध्ययन कृती क्रमांक : 10 .6** **कृतीचे नाव** – 'कडुलिंब'

**उद्देश -** विद्यार्थ्यांनी झाडाची माहिती समजून घेतील. कडुलिंब व नारळाच्या झाडांचा उपयोग कोणकोणत्या गोष्टीसाठी होतो ते समजून घेतील.झाडांचे संरक्षण करतील.

**कृतीचे विवरण-** शिक्षकांनी कडुलिंब पाठाचे आदर्श वाचन करून त्याची माहिती व उपयोग याविषयी चर्चात्मक पद्धतीने सांगणे. एका गटाकडून वनस्पतीच्या भागाचा उपयोग लिहिण्यासाठी व चित्र काढण्यास सांगणे. व दुसऱ्या गटाकडून माहिती लिहून वाचन करून घेणे. त्याचप्रमाणे नारळाची माहिती सांगणे झाडांचे संरक्षण व त्यांचे महत्त्व पटवून देणे. शाळेच्या,घराच्या परिसरात झाडे लावणे व वाढविणे हा उपक्रम राबवणे. 'निसर्गाला जपूया' या विषयी माहिती देणे.

**संबंधित पाठ क्रमांक:** -पाठ क्रमांक 4 'कडुलिंब'

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र:** 10.6

**अध्ययन कृती क्रमांक 10.7** **कृतीचे नाव**– तेनाली रामाच्या चातुर्यकथा.

**उद्देश-** तेनाली रामा हा कसा हुशार होता याविषयी जाणून घेणे. कृष्णदेवरायाच्या दरबारात चांगल्या सल्लागाराची भूमिका कशी बजावत होता, हे समजून घेतील.

**कृतीचे विवरण** – शिक्षकांनी पाठाचे आदर्श वाचन करून त्याचे स्पष्टीकरण सांगणे. विद्यार्थ्यांचे गट करून पाठाचे वाचन करून घेणे. ही गोष्ट आपल्या भाषेत विद्यार्थ्याकडून लिहून घेणे. नवीन शब्दांचे अर्थ सांगून लिहून घेणे.

**शैक्षणिक साहित्य-** पुस्तक, चित्र

**संबंधित पाठ क्रमांक:**

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र:** 10.7

**अध्ययन कृती क्रमांक -10 .8** **कृतीचे नाव -** 'सुगी', 'चिमणी'

**उद्देश-** संबंधित कवितेतील  झाडाचे वर्णन समजून घेतील. त्यातील शब्द समजून घेतील.चिमणी घरटे कसे बांधते हे समजून घेतील. बोलीभाषा व प्रमाण भाषेतील शब्द समजून घेतील.

**कृतीचे विवरण-** शिक्षक कवितेचे आदर्श वाचन करून भावार्थ सांगतील. व त्यांच्यातील लयबद्ध शब्द वाचन व लिहिण्यासाठी दोन गट करून घेतील. 'चिमणी' कविता वाचून चिमणी घरटे कसे बांधते, त्यासाठी ती कोणत्या वस्तू घेते त्या वस्तूंची नावे विद्यार्थ्यांकडून लिहून घेणे. अशा प्रकारे त्यांना इतर पक्षांची घरटी याविषयी अधिक माहिती देणे.

**शैक्षणिक साहित्य-** कवितासंग्रह, युट्युब लिंक

**संबंधित पाठ क्रमांक:** -पाठ क्रमांक 14

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र :** 10.6

**अध्ययन निष्पत्ती : 5.11**

भाषेचे सूक्ष्म घटक असलेले विरामचिन्हे, समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, वचन विचार, लिंग विचार या विषयी जाणून घेतात व आपल्या लेखनात त्याचा वापर करतात.

**अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती व महत्त्व:** भाषेच्या अभ्यासात विराम चिन्हांचे महत्व जाणून घेतात.योग्य विराम चिन्हाचा वापर आपल्या लेखनात करतात.पाठ्यपुस्तकात आलेल्या विविध शब्दांचे समानार्थी शब्द शोधतात व समजून घेतात.विरुद्धार्थी नवीन शब्द समजून घेतात व आपल्या लेखनात वापर करतात.एक वचन, अनेक वचन समजून घेऊन त्याचा योग्य वापर आपल्या लेखनात व भाषणात करतात.व्याकरणातील लिंग विचार समजून घेऊन त्याचा वापर आपल्या लेखनात व भाषणात करतात.

**अध्ययनकृती : 11.1a**

**अध्ययन कृतीचे नाव –** 'ओळख पाहू विरामचिन्हे '

**कृतीचा उद्देश :** विद्यार्थी विरामचिन्हांचा वापर करून योग्य स्वरभारासह वाचन करतील व योग्य ठिकाणी योग्य विरामचिन्हांचा वापर आपल्या लेखनात करतील.

**कृतीचे विवरण :** सुलभकांनी विरामचिन्हांची फ्लॅश काड्‌र्स विद्यार्थ्यांकडून तयार करून घ्यावी किंवा स्वतः तयार करावीत. विद्यार्थ्यांना प्रथम त्यांची ओळख करून द्यावी.एक विद्यार्थ्यांना उभे करून फ्लॅश कार्ड वरील चिन्ह व त्याचे नाव वाचून दाखवतील व त्याचा वापर कोठे होतो याचे विवरण सुलभकांनी करावे.त्यानंतर एक विद्यार्थी विरामचिन्हाचे एक फ्लॅश कार्ड घेऊन वर्गासमोर उभा राहील व त्या चिन्हाचे नाव वर्गातील इतर विद्यार्थी सांगतील. याप्रमाणे इतर सर्व विद्यार्थ्यांकडून कृती करून घ्यावी.

**शैक्षणिक साहित्य:** फ्लॅश कार्ड, कार्डशिट, स्केचपेन, मार्कर इत्यादी

**संबंधित पाठ क्रमांक :** पाठ्य पुस्तकातील गद्य व पद्य भाग

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र .** 11.1a

**अध्ययन कृती : 11.1b**

**अध्ययन कृतीचे नाव –** 'पर्यायी शब्द निवडा'

**कृतीचा उद्देश :** विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी आणि पर्यायी शब्द सामर्थ्यात वाढ व्हावी.

**कृतीचे विवरण:** विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील आलेल्या शब्दांचा संग्रह करून त्या शब्दांना समानार्थी शब्दांची यादी तयार करण्यास सांगावे व मार्गदर्शन करावे.

**शैक्षणिक साहित्य :** कार्डशिट, तक्ते, मार्करपेन, स्केचपेन इत्यादी

**संबंधित पाठक्रमांक :** 2, 7, 16, 17,19

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र**: 11.1b

**अध्ययन कृती: 11.2a** **कृतीचे नाव –** 'शोध घेऊया शब्दांचा'

**उद्देश:** विरुद्धार्थी शब्दांचा संग्रह करतील व विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडेल.

**कृतीचे विवरण** : विद्यार्थ्यांचे गट करून त्यांच्याकडून विरुद्धार्थी शब्दांचे फ्लॅशकार्ड तयार करून घेणे.गटातील विद्यार्थ्यांच्या संख्येप्रमाणे शब्दांची फ्लॅश कार्ड त्यांच्याकडे द्यावी. एका गटातील एका विद्यार्थ्याला उभे करून त्याच्याकडे असलेला शब्द वाचण्यास सांगावे व त्याच्या विरुद्धार्थी शब्द ज्या गटाकडे आहे त्याने उभा राहून ते वाचून दाखवावे. याप्रमाणे इतर सर्व विद्यार्थ्यांकडून कृती करून घ्यावी.

**शैक्षणिक साहित्य** : स्केचपेन, मार्कर, कार्डसीट इत्यादी.

**संबंधित पाठ क्रमांक**: 3, 8, 21.

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्** :.112 a

**अध्ययन कृती क्रमांक: 11.2b** **कृतीचे नाव** - ‘ ढगातील शब्दांशी खेळूया.’

**उद्देश** : दिलेल्या शब्दातील योग्य शब्द निवडून विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या जुळतील.

**कृतीचे विवरण :**चौकोनात ढगाच्या आकारात काही शब्द दिले आहेत त्या शब्दांमध्ये असलेले विरुद्धार्थी शब्द निवडून त्यांच्या जोड्या खाली दिलेल्या जागेत लिहावयास सांगणे.

**शैक्षणिक साहित्य**: शब्द पट्ट्या,कार्डशिट, फ्लॅश कार्ड, स्केचपेन, मार्कर इत्यादी.

**संबंधित पाठ क्रमांक.:** 3,8,12.

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र**: 11.2 b

**अध्ययन कृती: 11.4** **कृतीचे नाव** - ऐका व समजून घ्या.

**उद्देश :** व्याकरणातील वचन विचार समजून घेतील. एकवचन व अनेकवचनाचा वापर आपल्या बोलण्यात व लेखनात करतील.

**कृतीचे विवरण:** शब्दाच्या नामांच्या पट्ट्या तयार करून घेणे.दिलेल्या शब्दाच्या नावावरून नामाच्या रूपावरून ती एक आहे की अनेक आहे हे कसे ओळखावे हे समजून सांगणे. कृती पुस्तकातील कृती सोडवून घेणे.

**शैक्षणिक साहित्य :**एकवचनी व अनेक वचनी नामांची फ्लॅश कार्ड.

**संबंधित पाठ क्रमांक**: 6.

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र**: 11.4

**अध्ययनकृती :11.5** **कृतीचे नाव** - वाचा व समजून घ्या.

**उद्देश:.**विद्यार्थ्यांना नावाच्या रूपातील लिंग ओळखता येईल.

**कृतीचे विवरण**: नामाचा लिंगविचार यासंबंधी दिलेली माहिती समजून घेऊन नामाचे लिंग ओळखण्याची पद्धत समजून घेणे. विविध शब्द देऊन त्यांचे वर्गीकरण पुल्लिंग, स्त्रीलिंग आणि नपुसकलिंग अशा गटात करून घेणे.

**शैक्षणिक साहित्य.:** लेखन साहित्य, वही  इत्यादी.

**संबंधित पाठ क्रमांक:** 8,

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र**: 11.5 a,b,c,

**अध्ययन निष्पत्ती: 5.12**

भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण अव्यय, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय, केवलप्रयोगी अव्यय या संबंधी जाणून घेतात व त्यांचा उपयोग आपल्या लेखनात व बोलण्यात करतात.

**अध्ययन निष्पत्तीची व्याप्ती आणि महत्त्व :** भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक जाणून घेतात.शब्दांच्या जाती ओळखतात.विकारी आणि अविकारी शब्द ओळखतात.नामांच्या

प्रकाराची जाणीव करून घेतात.सर्वनामे ओळखून त्याचा वापर आपल्या बोलण्यात आणि लेखनात करतात.वाक्यातील विशेषणे ओळखतात व त्याचा वापर आपली भाषा समृद्ध करण्यासाठी करतात.वाक्यातील क्रियापद ओळखून वाक्यानुसार त्याचे बदलणारे रूप ओळखतात.वाक्यातील कर्ता, कर्म, क्रियापद ओळखतात.वाक्यातील विशेषणे ओळखतात त्यांचा वापर आपल्या बोलण्यात आणि लेखनात करतात.शब्दयोगी अव्यय ओळखतात व यांच्या वापराबद्दल जाणून घेतात. उभयान्वयी अव्यय ओळखतात व त्याचा वापर आपल्या लेखनात करतात.केवलप्रयोगी अव्यय ओळखतात यांचा वापर समजून घेतात.

**अध्ययन कृती क्र .: 12.1** **कृतीचे नाव -** चला खेळूया शब्दांशी.

**उद्देश**: शब्दांच्या विविध जाती समजून घेतील.

**कृतीचे विवरण**: शब्दांच्या आठ जातीसंबंधी माहिती सांगणे व त्यातील विकारी आणि अविकारी शब्दांच्या जाती विषयी स्पष्टीकरण द्यावे.शब्दांचे फ्लॅश कार्ड तयार करून त्यातील सामान्य नाम विशेष नाम भाववाचक नाम कसे ओळखावे यासंबंधी चर्चा करणे.

**शैक्षणिक साहित्य**: शब्द पट्ट्या, फ्लॅश काड्र्स.

**संबंधित पाठ क्रमांक :** 3,5

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र**: 12.1

**अध्ययन कृती क्रमांक:12.2** **कृतीचे नाव -** सर्वनाम ओळखूया.

**उद्देश-** सर्वानाम म्हणजे काय हे समजून घेतील.

**कृती विवरण-** परिच्छेदात आलेल्या सर्वनावांची यादी दिलेल्या चौकटीत करून घेणे त्याच बरोबर इतर सर्व नामांची ओळख करून देऊन त्यांचे फ्लॅश काड्र्स तयार करून घेणे .प्रत्येक विद्यार्थ्याकडे एकेक कार्ड देऊन त्या सर्वनामाचा वापर करून एक वाक्य तयार करण्यास सांगणे.

**शैक्षणिक साहित्य:** फ्लॅश काड्र्स, शब्द पट्ट्या

**संबंधित पाठ क्रमांक :** 22

**कृती पुस्तकातील कृती क्रमांक :** 12.2

**अध्ययन कृती क्र. : 12.3** **कृतीचे नाव** - शब्दफुले बनवूया.

**उद्देश** -वाक्यातील विशेषणे ओळखता येतील.

**कृतीचे विवरण**: विशेषण व त्याचे प्रकार याची माहिती सांगून चर्चा करणे. विशेषणांच्या शब्दपट्ट्या, वाक्य पट्ट्या तयार करून घेणे. त्यांचे वाचन घेऊन, विशेषणांचा वापर करून वाक्य तयार करण्यास सांगणे.

**शैक्षणिक साहित्य**: कार्डशीट, मार्कर, शब्द पट्ट्या इत्यादी.

**संबंधित पाठ क्रमांक**: 13.

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र**: 12.3

**अध्ययन कृती क्र.-12.4** **कृतीचे नाव** - क्रियापद ओळखा कृती करा.

**उद्देश** : वाक्यातील क्रियावाचक शब्द ओळखतील. कर्ता, कर्म, क्रियापद ओळखतील.

**कृतीचे विवरण**: क्रियापदाचा अर्थ समजावून सांगून दिलेल्या वाक्यातील क्रियापद ओळखण्यास सांगणे. वाक्य तयार करून घेऊन त्या वाक्यातील कर्ता, कर्म, क्रियापद ओळखायला सांगणे. दिलेल्या चित्रासंबंधी विद्यार्थ्यांना वाक्य लिहिण्यासाठी प्रोत्साहित करून त्यातील क्रियापद ओळखण्यास सांगणे. मार्गदर्शन करणे.

**शैक्षणिक साहित्य.=** , शब्द पट्ट्या, फ्लॅश कार्ड, कार्डशीट, मार्कर इत्यादी.

संबंधित पाठ क्रमांक .:13,

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र**: 12.4

**अध्ययन कृती क्रमांक 12.5** **कृतीचे नाव -** क्रियाविशेषणे ओळखा.

**उद्देश :** क्रियाविशेषणाबद्दल जाणून घेतील व त्याचा आपल्या लेखनात वापर करतील.

**कृतीचे विवरण**.. क्रियाविशेषण संबंधीची माहिती सांगून दिलेल्या वाक्यातील क्रियाविशेषण ओळखावयास सांगणे. क्रियाविशेषण असलेल्या वाक्यांच्या पट्ट्या विद्यार्थ्यांच्या कडून तयार करून घेणे व त्यांचे सादरीकरण करावयास सांगणे.

**शैक्षणिक साहित्य:** कार्डशीट, मार्कर, शब्द पट्ट्या ,वाक्यपट्ट्या इत्यादी.

**संबंधित पाठ क्रमांक :** 15 **विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र**: 12.5

**अध्ययन कृती क्रमांक : 12.6** **कृतीचे नाव -** शब्द जोड रूप बदल.

**उद्देश.**शब्दांच्या रूपात होणारा बदल समजून घेतील .शब्दयोगी अव्यये ओळखतील .

**कृतीचे विवरण** : शब्दयोगी अव्यय संबंधीची माहिती सांगून काही शब्दयोगी अव्यय याची यादी तयार करण्यास सांगावे. शब्दयोगी अव्यय यांच्या वापरानंतर मूळ शब्दात होणारा बदल कसा होतो यासंबंधी चर्चा करून स्पष्टीकरण देणे. मूळ शब्द, शब्दयोगी अव्यय आणि त्यानंतर त्यांच्या सामान्यरूपात होणारे बदल अशा शब्द पट्ट्या तयार कराव्या .वर्गातील विद्यार्थ्यांचे तीन गट तयार करून एका गटाकडे मूळ शब्द, दुसऱ्या गटाकडे शब्दयोगी अव्यय, तिसरा गटाकडे त्यापासून तयार होणाऱ्या शब्दांच्या पट्ट्या द्याव्यात. पहिल्या गटातील विद्यार्थ्याने उभा राहून एका शब्दाचे वाचन करावे. दुसऱ्या गटातील विद्यार्थ्यांनी एक शब्द योगी अव्यय सांगावे आणि तिसऱ्या गटातील विद्यार्थ्याने मूळ शब्दाला शब्दयोगी अव्यय जोडल्यानंतर तयार होणाऱ्या शब्दाचे फ्लॅश कार्ड दाखवून ते वाचावे. या प्रमाणे विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करुन विविध शब्द तयार करावयास सांगणे.

**शैक्षणिक साहित्य:** शब्द पट्ट्या, फ्लॅश कार्ड इत्यादी.

**संबंधित पाठ क्रमांक**.:16.

**विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र**: 12.6

**अध्ययन कृती क्रमांक 12.7** **कृतीचे नाव** - शब्द जोडा.

**उद्देश:** उभयान्वयी अव्ययासंबंधी जाणून घेतील छोटी छोटी वाक्ये किंवा शब्द शब्दयोगी अव्ययाच्या साहायाने जोडतील.

**कृतीचे विवरण :**उभयान्वयी अव्यय यासंबंधीची चर्चा करतील व त्यांची यादी बनवून प्रत्येक उभयान्वयी अव्ययासंबंधित चे एकेक वाक्य विद्यार्थ्यांना तयार करण्यास सांगावे व त्याचे वर्गात सादरीकरण करून त्यांना प्रोत्साहित करणे. दिलेली कृती करून घेणे.

**शैक्षणिक साहित्य** : उभयान्वयी अव्ययांची शब्द पट्ट्या, फ्लॅश कार्ड

**संबंधित पाठ क्रमांक** : 16 ***विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र**: 12.7

**अध्ययन कृती क्र12 ..8** **कृतीचे नाव** - चकित करा.

**उद्देश -** योग्य प्रसंगी उचित उदगारवाचक शब्द वापरतील

**कृतीचे विवरण :** केवप्रयोगी अव्यय म्हणजे काय याची माहिती देणे. यासंबंधीची चर्चा करणे . विविध प्रसंगामध्ये आपल्या भावना अचानकपणे व्यक्त करण्यासाठी उद्गार काढतो. त्यासंबंधी विशेष चर्चा करून विद्यार्थ्यांना दिलेल्या वाक्यातील उद्गारवाचक शब्द ओळखण्यास सांगणे व त्या संबंधीची कृती करून घेणे. उद्गारवाचक शब्दांच्या शब्द पट्ट्या, फ्लॅश कार्ड तयार करून घेणे. एकेक शब्द विद्यार्थ्यांना दाखवून त्याचा वाक्यात वापर करण्यास सांगणे, प्रोत्साहन देणे.

**शैक्षणिक साहित्य**: उद्गारवाचक शब्दांच्या शब्द पट्ट्या, फ्लॅश कार्ड इत्यादी .
**संबंधित पाठ क्रमांक**: 17 ***विद्यार्थी कृती पुस्तकातील कृती क्र.**: 12.8

## संदर्भग्रंथ

| अ. न. | ग्रंथ | प्रकाशक |
|---|---|---|
| 1 | माय मराठी पाठ्य पुस्तक | डी. एस. ई. आर. टी. बेंगळूरू |
| 2 | दीक्षा पोर्टल | कर्नाटक सरकार |
| 3 | नपूण भारत | भारत सरकार |
| 4 | कृती संचिका | DIET बेळगावी |
| 5 | यु– ट्यूब वरील शैक्षणिक लिंक | युट्यूब |